महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

शनिवार ■ ०२ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मराठी शाळांवर गंडांतर ?

## ठाणे जिल्ह्यातील १८ शाळा कायमच्या बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मागील सात वर्षांत ठाणे महापालिकेच्या हद्दीत तब्बल १८ मराठी प्राथमिक शाळा बंद झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शिक्षण विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, गेल्या दोन वर्षांत १३ प्राथमिक शाळा बंद झाल्या आहेत. तर करोनापूर्वी ९ माध्यमिक शाळांमध्ये वाढ झाल्यानंतर पाच वर्षांत एकही शाळा वाढली नाही.

विशेष म्हणजे, करोनाकाळानंतर केवळ दोन वर्षांत १३ शाळा बंद झाल्या असून, यातील अनेक शाळा शहरातील मध्यवर्ती भागात होत्या. टेंभी नाका येथील सर्वात जुनी शाळा ७आणि १७ क्रमांकाच्या मराठी शाळांमध्ये आता इंग्रजी माध्यमाचे वर्ग भरवले जात असल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार, २०१८-१९ मध्ये ठाणे शहरात १२१ प्राथमिक शाळा होत्या. मात्र २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात ही संख्या केवळ १०३वर आली आहे. माध्यमिक शाळांची संख्या मात्र २२वर स्थिर आहे. मराठी शाळांचे कमी होष्णारे प्रमाण चिंताजनक आहे. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या इतकी कमी झाली की, त्या शाळा चालवणे आर्थिक दृष्टिकोनातून अशक्य झाले. मराठी शाळा वाचवण्यासाठी ठोस धोरणांची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच महापालिकेने मराठी शाळांसाठी प्रचार व विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी योजना आखाव्यात, अशी मागणी होऊ लागली आहे. मराठी शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आता फक्त आंदोलन नव्हे तर कृती हवी, अन्यथा काही वर्षांतच शहरातून मराठी प्राथमिक शिक्षण पूर्णपणे नाहीसे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या प्रश्नी शिक्षण विभागाशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

# भाजपाची मोर्चेबांधणी

**जिल्हाध्यक्ष व महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा यांच्यासमवेत आढावा बैठक**

**बूथ समिती व जिल्हा कार्यकारीणीच्या कामाचा आढावा**

**संघटन बांधणीच्या दृष्टीने चर्चा**




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीला भाजपने वेग दिला असून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी पक्षाचे माजी खासदार, आमदारांची बैठक घेतली. प्रत्येक माजी खासदार आणि आमदाराने पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील एक-एक मंडल दत्तक घ्यावे, असे आवाहन चव्हाण यांनी बैठकीत केले. येत्या ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यांत राज्यात महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, गुरुवारच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने पक्षाची रणनीती आखण्यात आली. तसेच संघटनात्मक स्थितीचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. बूथस्तरापासून मतदान केंद्रांपर्यंतची मोर्चेबांधणी, पदाधिकाऱ्यांची जबाबदारी, संपर्क मोहिमा यांवर यावेळी भर देण्यात आला. कार्यकर्त्यांचा जोष, जनसंपर्क आणि केंद्र-राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवणे यांवरही विशेष लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय झाला. या बैठकीला माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, संजय केनेकर, माधवी नाईक, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कोडगे उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जय्यत तयारी

**माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा पक्षप्रवेश**

शिवसेनेत २०२२ मध्ये उभी फूट पडल्यानंतर, फुटीर आमदारांना उद्देशून ५० खोके, एकदम ओके अशी घोषणा देऊन एकनाथ शिंदे गटाला खिजवणारे जालन्याचे काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी गुरुवारी आपल्या समर्थकांसह गुरुवारी भाजपमध्ये प्रवेश केला. गोरंट्याल यांच्या भाजपप्रवेशाने काँग्रेसला मराठवाड्यात धक्का बसला आहे. 'भाजपमध्ये प्रवेश करताना आपण कोणतीही अपेक्षा ठेवलेली नाही. केंद्र आणि राज्यातील निर्णायक नेतृत्वावर विश्वास ठेवून विकासासाठी आपण भाजपमध्ये प्रवेश केला आहे. जालन्याच्या पहिल्या महापालिका निवडणुकीत पहिला महापौर भाजपचा होईल. पक्ष देईल ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडेन,' असे गोरंट्याल यांनी यावेळी सांगितले. दोन दिवसांपूर्वी परभणीचे माजी आमदार सुरेश वरपुडकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपची वाट धरली होती.

### थोडक्यात महत्वाचे

# भिवंडी-वाडा रस्ता खड्डयात

## वाहन चालक त्रस्त




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा, ता. ३१ (बातमीदार) भिवंडी-वाडा रस्त्याचे काम गेल्या चार-पाच दिवसांपासून बंद असल्याने विशेषतः प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. निधी मिळाला नसल्याने हे काम बंद असल्याचे कंपनीकडून सांगितले जात आहे. शासन व ठेकेदार कंपनीमुळे प्रवासी व सामान्य नागरिक मात्र भरडला जात असल्याने नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

भिवंडी, वाडा, मनोर या रस्त्याच्या सिमेंट क्रॉकीटीकरणाचे काम इगल या ठेकेदार कंपनीला मिळाले असून यासाठी ८०२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. कंपनीने हे काम सुरू केले असून तानसा पूल ते कुडूस या अंतरापर्यंत काम काही टप्पे वगळता पूर्ण झाले आहे. तर, शिरीष पाडा ते वाडा खंडेश्वरी नाका येथेपर्यंत काम काही टप्पे वगळता एका बाजूचे काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. आता एका बाजूला संपूर्ण खोदकाम केले आहे. त्यातच सद्यस्थितीत रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून यामुळे नित्याचीच वाहतूक कोंडी होत आहे. याचा त्रास वाहनचालकांसह नागरिकांना होत असून नागरिक हैराण झाले आहेत. याची दखल घेऊन श्रमजीवी संघटनेने काही दिवसांपूर्वी भिवंडी-वाडा महामार्गावर एकाच वेळी अनेक ठिकाणी रास्ता रोको आंदोलन छेडून प्रशासनाला जाब विचारला होताय याची दखल घेत प्रशासनाने रस्ता सुस्थितीत करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. आंदोलनानंतर काही दिवस रस्त्याची दुरुस्ती करून रस्ता सुस्थितीत करुन दिला होता. मात्र, आता पुन्हा खड्यात गेला असून त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. आता तर शासनाकडून पैसे मिळाले नाहीत म्हणून गेल्या चार पाच दिवसांपासून काम बंद करण्यात आले असल्याने वाहनचालक प्रवाशांसह नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

**दुसऱ्या ठेकेदाराला काम द्यावे**

शासनाकडून पैसे न मिळाल्याने गेल्या चार पाच दिवसांपासून काम बंद करण्यात आले असल्याचे समजले आहे. या कंपनीकडून काम काढून घेऊन निविदेतील दुसऱ्या क्रमांकांच्या ठेकेदार कंपनीला हे काम देण्यात यावे. जर काम करण्याची ठेकेदार कंपनीची कुवत नसेल तर प्रशासनाने हा निर्णय घ्यावा, असे काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी म्हंटले आहे.

**बिल प्रलंबित; काम ठप्प**

बांधकाम विभागाकडे आत्तापर्यंतच्या झालेल्या कामाचे बिल पाठवण्यात आले असून प्रशासनातील कोणीही यावर बोलायला तयार नाही. आत्तापर्यंत ठेकेदार कंपनीला एक रूपयाही मिळालेला नाही. मागील वेळी झालेल्या आंदोलनामुळे कंपनीने दीड कोटी रूपये खर्च करून खड्डे बुजविले आहेत. ते पैसे आम्हाला मिळणार नाहीत, आता मशिनरीमध्ये टाकायला डिझेल नाही. त्यामुळे आम्ही हे काम बंद ठेवले आहे, असे इगल कंपनी व्यवस्थापक दिनेश सिंग यांनी म्हंटले आहे.



# काळू नदीच्या धबधब्यावर अडकलेल्या पर्यटकांची सुटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मनाई आदेश असूनही काळू नदीच्या उगमस्थानी असलेल्या धबधब्यावर बोरिवलीहून 250 पर्यटक पावसाळ्यात मौजमजा करण्यासाठी आले होते. पण पाण्याचा प्रवाह वाढला आणि सर्वजण अडकले. मात्र पोलिसांनी वेळीच धाव घेत स्थानिकांच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन करीत सर्वांची सुखरूप सुटका केली. दरम्यान धबधब्यावर कोणीही जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुरबाडमधील माळशेज घाट व नाणेघाट येथे दरवर्षी अनेक पर्यटक पावसाळ्यात जातात. मात्र तेथे धांगडधिंगा होत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी 25 सप्टेंबरपर्यंत बंदी घातली आहे. ही बंदी धुडकावून बोरिवलीहून बुधवारी काळू नदीजवळ असलेल्या धबधब्यावर आले. नदीचे उगमस्थानच येथून असल्याने पाण्याचा मोठा प्रवाह होता. त्याचा अंदाज न आल्याने कोणालाच बाहेर पडता येईना. ही माहिती मिळताच मुरबाड पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने या सर्वांची सुटका केली. या पर्यटकांची पोलिसांनी चांगलीच हजेरीही घेतली.



"भारतीय जनता पार्टीचे मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन बदलापुरातील विकास कामांबद्दल सकारात्मक चर्चा केली. सदर चर्चेसाठी मा.नगराध्यक्ष, राजेंद्र घोरपडे महामंत्री, संभाजी शिंदे, मा. शहराध्यक्ष शरद तेली, बदलापूरचे विद्यमान शहराध्यक्ष रमेश सोळशे उपस्थित होते.

# विजेच्या लपंडावाने जिल्ह्यातील उद्योजक हैराण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे :** विविध करांचा भरमसाट बोज्याने कारखाने, उद्योगधंद्यांचे कंबरडे मोडले आहे. आधीच खंगलेला उद्योग आता वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे पुरता जेरीस आला आहे. ठाण्यातील वागळे इस्टेट औद्योगिक पट्ट्यात विजेचा रोजच खेळखंडोबा सुरू असून उद्योजकही अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे हैराण झाले आहेत. त्यामुळे आता आम्ही कारखाने गुजरातला न्यायचे का? असा निर्वाणीचा इशारा उद्योजकांनी सरकारला दिला आहे. ठाणे लघुउद्योजकांची संघटना असलेल्या 'टिसा'च्या माध्यमातून आज महावितरण अधिकारी आणि उद्योजकांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उद्योजकांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले.

ठाण्याचा वागळे इस्टेट परिसर हा औद्योगिक क्षेत्र म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी लघु आणि मध्यम उद्योगांसह मोठ्या प्रमाणात आयटी पार्कदेखील आहेत. गेल्या तीन वर्षांपासून या भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने उद्योजकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. नेहमी होणाऱ्या विजेच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन (टिसा) येथे महावितरण अधिकारी आणि उद्योजक यांची आज बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ठाणे शहरासह कल्याण, शहापूर, पनवेल, खालापूर, कळंबोली अशा विविध भागातील 50 ते 60 उद्योजक या बैठकीला उपस्थित होते.

# उल्हासनगरात धोकादायक इमारत कोसळली घरांचे नुकसान ; जीवित नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर कॅम्प-३ मधील महापालिकेने 'अतिधोकादायक' म्हणून घोषित केलेली पाच मजली इमारत रात्रीच्या सुमारास कोसळली. ही इमारत आधीच रहिवाशांकडून रिकामी करून सील करण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, इमारतीचा ढिगारा शेजारील बैठ्या घरांवर पडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.



कॅम्प-३ मधील सी ब्लॉक परिसरात असलेली 'शिव जगदंबा अपार्टमेंट' ही पाच मजली इमारत असून, त्यात २९ सदनिका आणि दोन दुकाने होती. महापालिकेने ही इमारत अतिधोकादायक म्हणून घोषित केल्यानंतर ती रहिवाशांकडून रिकामी करून सील केली होती. मात्र, काल रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास या इमारतीचा टेरेसपासून तळमजल्यापर्यंतचा मागील भाग पूर्णपणे कोसळला. या दुर्घटनेत इमारतीचा मलबा शेजारील बैठ्या घरांवर पडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने, या घरांमध्ये राहणारे नागरिक वेळीच बाहेर पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच उल्हासनगर महापालिकेचे अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.










# डोंबिवली - ठाणे रेल्वे समांतर रस्त्यासाठी केडीएमसीचा पुढाकार


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवलीहून ठाणे, मुंबईला जाण्यासाठी उल्हास खडीवरील मोठागाव-माणकोली उड्डाणपूल लोकार्पणा आधीच सुरू झाला. आता डोंबिवलीहून ठाण्याला जोडणाऱ्या रेल्वे समांतर रस्त्याचे सर्वेक्षण सुरू करण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त अभिनव गोयल यांनी पुढाकार घेतला आहे.

या रस्त्यासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण सुरू करण्याचे निर्देश आयुक्त गोयल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. आमदार राजेश मोरे यांनी त्यांच्या मतदारसंघातील विविध विकासकामांसह डोंबिवली ते ठाणे समांतर रस्त्याचा विषय चर्चेला आणल्यानंतर आयुक्तांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले. मुंबई-ठाणेकरांची जीवनवाहिनी असलेल्या लोकलमध्ये वाढलेली जीवघेणी गर्दी, लोकलच्या दरवाजात लटकून प्रवास करताना प्रवासी पडून होणारे अपघात यावर उपाययोजना करण्यासाठी तत्कालीन आमदार हरिश्चंद्र पाटील यांनी डोंबिवली-ठाणे समांतर रस्त्याचा पर्याय समोर आणला होता.

समस्त डोंबिवलीकरांच्या या मागणीचा धागा पकडून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे तत्कालीन आमदार तथा मनसेचे नेते राजू पाटील यांनी लक्षवेधी आयुधाचा वापर करून सविस्तर सुचनेद्वारे अधिवेशनात सभागृहाचे लक्ष्य केंद्रित केले होते. त्यामुळे अतिशय कमी वेळेत कल्याण-डोंबिवलीहून ठाण्याला जाण्यासाठी लोकलशिवाय कोणताही पर्याय नसल्याने डोंबिवली ते ठाणे समांतर रस्ता हा काळाची गरज असल्याने या महत्त्वाकांक्षी रस्त्याचे एक पाऊल पुढे पडले आहे ही नक्कीच सकारात्मक बाब आहे.

# गीतासार



### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् । विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ॥ १८-१४ ॥

कर्म पूर्ण होण्यासाठी अधिष्ठान, कर्ता, निरनिराळ्या प्रकारची करणे, अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या क्रिया आणि तसेच पाचवे कारण दैव आहे. ॥ १८-१४ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः । न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः ॥ १८-१५ ॥

मनुष्य मन, वाणी आणि शरीर यांनी शास्त्राला अनुसरून किंवा त्याविरुद्ध कोणतेही कर्म करतो, त्याची ही पाचही कारणे असतात. ॥ १८-१५ ॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः । पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १८-१६ ॥

परंतु असे असूनही जो मनुष्य अशुद्ध बुद्धीमुळे कर्मे पूर्ण होण्यामध्ये केवळ आणि शुद्धस्वरूप आत्म्याला कर्ता समजतो, तो मलिन बुद्धीचा अज्ञानी खरे काय ते जाणत नाही. ॥ १८-१६ ॥

यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥ १८-१७ ॥

ज्या माणसाच्या अंतःकरणात मी कर्ता आहे, असा भाव नसतो, तसेच ज्याची बुद्धी सांसारिक पदार्थांत आणि कर्मांत लिप्त होत नाही, तो माणूस या सर्व लोकांना मारूनही वास्तविक तो मारत नाही आणि त्याला पापही लागत नाही. ॥ १८-१७ ॥

# ईद आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांची कामे पूर्ण करा

## - आ. महेश चौघुलेंचे भिवंडी मनपाला निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : आगामी रक्षाबंधन, गोकुळाष्टमी आणि गणेशोत्सव सारखे धार्मिक उत्सव तोंडावर आले आहेत असे असताना भिवंडी महापालिका आयुक्त प्रशासनाकडून नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिरंगाई होत आहे. याबाबत तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष केले जात आहे.



त्यामुळे संतप्त झालेले आमदार महेश चौघुले यांनी पालिका आयुक्त अनमोल सागर व अधिकाऱ्यांना सोबत घेऊन शहरातील विविध रस्त्यांची पाहणी करून महापालिका प्रशासन व ठेकेदाराचे कामा संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली. गणेशोत्सव, ईद-ए-मिलादपूर्वी रस्त्यांची काम पूर्ण करण्याचे निर्देश आ.चौघुले यांनी पालिका आयुक्त प्रशासनाला यावेळी दिले. श्रावण महिना व विविध धार्मिक उत्सवास सुरुवात होणार आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने खराब व खड्डेमय रस्ते दुरुस्त करावे, नियमित जंतुनाशक औषध फवारणी करून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी अशा विविध मागण्या गणेशोत्सव मंडळ व नागरिकांनी महापालिका आयुक्त प्रशासनाकडे केल्यामुळे भिवंडी पोलिसांनी सुध्दा पालिका प्रशासनाला पत्र पाठवून लक्ष देण्याची सुचना केली आहे तरीही दुर्लक्ष होत असल्याने भिवंडी आमदार महेश चौघुले यांच्या कडे तक्रारी जाताच त्यामुळे शहरातील विविध रस्त्यांची पाहणी करून पालिका प्रशासनाला धारेवर धरले..शहरातील भिवंडी - ठाणे रोडवर सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या रस्त्याचे कामात ठेकेदाराकडून होत असल्याने वाहतूक कोंडी व अपघात होत आहेत पादचारी नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्यासोबत आमदार चौघुले यांनी संबंधित रस्त्याची पाहणी करून मनपा कर्मचारी व ठेकेदाराची कडक शब्दांत कान उघडणी करून गोकुळाष्टमी, गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सणांपूर्वी रस्त्याचे काम तातडीने दर्जेदार पद्धतीने पूर्ण करा असे निर्देश आ.चौघुले यांनी दिले."सणाच्या काळात नागरिकांना वाहतुकीस अडथळा होणे अथवा अन्य प्रकारची गैरसोय होणे, हे मुळीच सहन केले जाणार नाही. कामात होणारी दिरंगाई आणि हलगर्जीपणा याविरोधात कठोर भूमिका घेण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी आयुक्त प्रशासनाला दिला. यावेळी आयुक्त अनमोल सागर यांनी तक्रारी गांभीर्याने ऐकून त्यांनी महापालिका प्रशासनाला तात्काळ उपाययोजना व कामावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश दिले.

# मुंबई विद्यापीठाचा युवक महोत्सव यंदा जीवनदीप महाविद्यालयात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली: मुंबई विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली आयोजित झोन क्रमांक 6 ठाणे पालघर ग्रामीण चा ५८ वा युवक महोत्सव २०२५ या वर्षी महाविद्यालय गोवेली येथे दिनांक ४ ऑगस्ट रोजी संपन्न होणार आहे .

मानवी जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा विद्यार्थ्यांच्या अंगी स्फूर्ती, उत्साह निर्माण व्हावा या हेतूने ५८ व्या युवक महोत्सवाचे आयोजन यावर्षी गोवेली महाविद्यालयात करण्यात आले आहे. झोन क्रमांक ६ ठाणे, पालघर ग्रामीण यामधील मुंबई विद्यापीठातील १९ महाविद्यालयांचा समावेश असणार आहे. या महोत्सव प्रसंगी संगीत एकपात्री ,नृत्य, गायन, रांगोळी व वक्तृत्व स्पर्धा यासारखे ४० कार्यक्रम या महोत्सवात पार पडणार आहेत सदर युवक महोत्सव जीवनदीप महाविद्यालय दुसऱ्यांदा पार पडत आहे.तरी या युवक महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व तरुणाईचा उत्साह वाढवावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ ,उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सतीश लकडे यांनी केले आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात महापुरुषांना अभिवादन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र शासन भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहभाग घेणारे अनेक नेते, क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक यांच्या बलिदानाने आज भारत देश हा स्वतंत्र झाला आहे. याच महान विभूतींच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी जीवनदीप महाविद्यालया मध्ये १ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईचे शिल्पकार नाना शंकर शेठ, तसेच स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच असे इंग्रजांना ठणकावून सांगणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची ३१ जुलै रोजीची जयंती साजरी करण्यासाठी जीवनदीप महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ ,उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी या महान पुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्यात वक्तृत्व कला निर्माण व्हावी या उद्देशाने IQAC व राज्यशास्त्र आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जया देशमुख यांनी केले स्पर्धकांचे परीक्षण हे प्रा. डॉ. निहारिका देशमुख, प्रा.डॉ. मनीषा काकडे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. धनश्री नाईक यांनी केले. सदर कार्यक्रम हा सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या संपन्न झाला.

# लोकमान्य टिळक व साहित्यरत्न अण्णा भाऊ साठेंना नमुंमपा मुख्यालयात अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, सहा. आयुक्त स्वरूपा परळीकर व शिल्पा देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# माणगाव पंचायत समिती अंतर्गत साई केंद्राची शिक्षण परिषद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : माणगाव पंचायत समिती अंतर्गत साई केंद्राची शिक्षण परिषद केंद्रप्रमुख अनिल नाचपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदोरे येथे संपन्न झाली.

शाळेतील विद्यार्थीनींनी इशस्तवन व स्वागत गीत सादर केल्यानंतर शाळेच्या वतीने केंद्रातील सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याच शाळेतील सहशिक्षिका हर्षदा बोऱ्हाडे यांनी इयत्ता पहिलीचा बदललेला अभ्यासक्रम व इंग्रजी विषयातील विविध नाविन्यपूर्ण ॲक्टिव्हिटी यावर शैक्षणिक साहित्याचा वापर करून बदललेल्या घटकांचे संदर्भासहित मार्गदर्शन केले. बदललेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची ओळख करून दिली. नळेफोडी शाळेचे मुख्याध्यापक सिकंदर लांडे यांनी भाषाविषयक नमुना पाठ सादर केला. इयत्ता पहिली ते चौथीच्या भाषेतील कविता व पाठावर मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनाशी कशी सांगड घालावी यावर





प्रकाश टाकला.स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी तयार करताना नवोदय परीक्षा, मंथन परीक्षा, आर.टी. एस. परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा यासारख्या स्पर्धा परीक्षेची भूमिका शाळेतील सहशिक्षिका संगीता सुरशेट्टे यांनी विषद केली. उसर बुद्रुक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. स्नेहलता महाजन यांनी भाषिक मनोरंजनात्मक खेळ याविषयी मार्गदर्शन करताना खेळातील साहित्य व त्याचा प्रभावी वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखवले. शाळेतील विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य मुलांचे भावविश्व उलगडायला कसे मदत करते याविषयी सखोल मार्गदर्शन केले. प्रशासकीय विषयामध्ये केंद्रप्रमुख अनिल नाचपल्ले यांनी नवभारत साक्षरता, शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, विद्यार्थी सुरक्षा, निपुण भारत अभियान, स्कॉप मूल्यमापन, शालेय परसबाग, विविध शालेय समित्या, 15 ऑगस्ट दिनी करावयाचे कवायत संचलन व घ्यावयाची शपथ, गुणवत्ता विकास कार्यक्रम, विद्यार्थी लाभाच्या योजना, राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अपघात विमा योजना, शाळेतील अभ्यागत रजिस्टर, यु-डायस पोर्टल वरील माहिती अद्ययावत करणे, शालेय पोषण आहार योजना, इको क्लब, एक पेड ना के नाम, यासह सर्व शालेय माहिती ऑनलाइन पोर्टलवर कशी भरावी यावर सविस्तर मार्गदर्शन केले.शिक्षण परिषदेचे संचलन साई शाळेचे सहशिक्षक संतोष चव्हाण यांनी केले. परिषदेला केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका दळवी या शाळेचे मुख्याध्यापक राजू पवार, मुकेश जाधव, सिकंदर लांडे, प्रेमकुमार कातकडे, उसर संगीता सुरशेट्टे हर्षदा बोऱ्हाडे, माध्यमिक शाळेतून लोकमान्य ज्ञानदीप विद्यालय साईचे सहशिक्षक जी.पी. पवार, सातपुते यांच्यासह केंद्रातील सर्व शाळांचे शिक्षक उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने परिषदेची सांगता करण्यात आली.

# अण्णाभाऊ साठे यांना ठाणे मनपाकडून अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे, सहाय्यक आयुक्त (नौपाडा) सोपान भाईक यांच्यासह ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे, सहाय्यक आयुक्त (नौपाडा) सोपान भाईक यांच्यासह ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालमत्ता कर भरण्यासाठी केडीएमसीची मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील करदात्यांनी दि. ३१ जुलै, २०२५ पुर्वी मालमत्ता कर भरल्यास मालमत्ता करात (शासकीय कर वगळून) ५ टक्के सवलत देण्यात आली होती.

सदरची मुदत दि. ३१ जुलै २०२५ ऐवजी दि. ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तरी, नागरीकांनी मालमत्ता कराचा भरणा दि. ३१ ऑगस्ट, २०२५ पुर्वी करुन ५ टक्के सुट मिळवा. तसेच, ऑनलाईन मालमत्ता कराचा भरणा करुन अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन मालमत्ता कर विभाग यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

"वेळेत कर भरुन २% शास्तीचा भुर्दंड टाळा, थकबाकी मुक्त रहा."

# मराठा महासंघाच्या वतीने बँक योजनांवर मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शहापूर तालुक्यासारख्या दुर्गम भागात जिथे दळणवळणाच्या सोयी मुबलक प्रमाणात आहेत व वस्ती देखील विखुरलेल्या स्वरूपात आहे, अशा ग्रामीण ठिकाणी लोकांना आपल्या दैनंदिन जीवनातून वेळ काढून जिल्ह्याच्या ठिकाणी जाणे सहज शक्य नसते. ही बाब लक्षात घेऊन अखिल भारतीय मराठा महासंघ, ठाणे ग्रामीण यांच्या वतीने अण्णासाहेब पाटील महामंडळ तसेच बँकेच्या योजनांच्या माहितीचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मराठा समाजाचा एकही गरजू घटक योजनेपासून दूर राहू नये, याकरिता महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील झपाट्याने काम करीत आहेत. कोकण विभागात लाभार्थी संख्या वाढावी याकरिता आम्ही देखील खेड्यापाड्यात जाऊन मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करीत आहोत, असे विभागीय समन्वयक प्रतीक्षा चव्हाण यांनी सांगितले.

त्याचबरोबर ग्रामीण भागातील लोकांना बँकांकडून कर्जपुरवठा कशाप्रकारे सुलभतेने मिळवता येईल याबद्दल जिल्हा अग्रणी व्यवस्थापक अभिषेक पवार यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर RSETI (rural self employment training institute) याचा कशाप्रकारे जास्तीत जास्त नागरिक लाभ घेऊ शकतात याबद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अखिल भारतीय मराठा महासंघ, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष मधुकर देशमुख, मराठा महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रमोद जाधव, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे समन्वयक शुभम शिंदे, संदेश काटकर, संध्या पाटेकर, आकाश सावंत, संदेश पाटेकर व खातिवली, टेंभुर्लि, खराडी, वाशिंद, निमनपाडा गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## रेसिपी

# राजगिऱ्याच्या पुऱ्या



साहित्य

राजगिऱ्याचे पीठ - 1 ते 2 कप
उकडलेले बटाटे - 2
सैंधव मीठ -
जिरे - 1/2 चमचा
हिरव्या मिरचीची पेस्ट - 1/2 चमचा
लिंबाचा रस
तेल
पाणी

कृती

एका भांड्यात राजगिऱ्याचे पीठ, स्मॅश केलेले बटाटे, सैंधव मीठ, हिरव्या मिरचीची पेस्ट, लिंबाचा रस एकत्र करा. गरजेनुसार पाणी टाकून कणिक मळून घ्यावे.
मळलेली कणिक 15 मिनिटांसाठी झाकून ठेवावी. यानंतर पीठ हाताला लावून पुरीसाठी लहान गोळे करून घ्यावेत.
हलक्या हाताने पुरी लाटून घ्यावी.
गरम तेलात पुऱ्या तळून घ्याव्यात.
अशा पद्धतीने तयार झाल्या आहेत राजगिऱ्याच्या पुऱ्या.

# बेहरे खडवली ग्रामपंचायत सरपंच पदी गीता कडव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : बेहरे खडवली ग्रामपंचायतीच्या सरपंच पदि गिता गजानन कडव यांची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी पराग भोसले यांनी दिली यावेळी निवडणुक प्रकियेला सदस्य प्रियांका राऊत, गिता कडव, नितीन गोरे, अनिल बांगर, जगन कडव, नरेश कथोरे, दिपाली शेलार, चेतन शेलार, वनिता





लांगे, शोभा चव्हाण, चतुरा गायकवाड, दर्शना जाधव, प्रियांका भोईर, स्वाती शेलार इत्यादी चौदा सदस्य उपस्थित होते, निवडणूक प्रक्रियेला ग्रामविस्तार अधिकारी बी बी पष्टे यांनी सहकार्य केले. नवनिर्वाचित सरपंच गिता कडव यांना शुभेच्छा देण्यासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, शिवसेना तालुका प्रमुख व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वसंत लोणे, मंगेश शेलार, आदेश चौधरी, अप्पा पाटोळे, समीर शेलार, बाळू गोरे, दिपक भोईर, बाळा बोरसे, फळेगावचे माजी सरपंच राजेंद्र बांगर, संतोष शेलार, समाजसेवक अशोक रातांबे, नितेश सोनावणे, राहुल पाटोळे, वैभव सोनावणे, रवि चक्र नारायण, रघुनाथ लोणे, तसेच ग्रामपंचायत कमैचारी राजेश भोईर, विशाल शेलार, अविनाश जाधव, दिनेश सोनावणे, ज्योती शेलार, विलास गायकर यांच्या सह भाजप शिवसेना युतीचे कायैकतै मोठ्या संख्येने उपस्थित होते.चाळीस वर्षे नंतर वाळकास गावाला सरपंच मिळाले आहे,

# आजचे राशि भविष्य



**मेष**
ज्येष्ठांना धार्मिक कार्यात रस राहील. आज मित्रांसोबत रेस्टॉरंटमध्ये जाल, तिथे आनंदाचे वातावरण असेल. ऑफिसमध्ये काही समस्यांमुळे मूड खराब होऊ शकतो.

**वृषभ**
ऑफिसमध्ये काही कामांची प्रशंसा होईल. स्पर्धेच्या तयारीत यश मिळेल. सराव सुरू ठेवा. स्वतःचा व्यवसाय सुरू करायचाय, चांगल्या संधी निर्माण होतील.

**मिथुन**
वैवाहिक जीवन उत्तम राहील.थोडा विचार करून व्यवसायात पुढे जाणे योग्य राहील. ठरवलेल्या कामात नक्कीच यश मिळेल. कोणावरही विश्वास ठेवू नये.

**कर्क**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहात, तुमचा सन्मान होईल.

**सिंह**
शक्य तितके सामान्य रहा. कायदा करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन विषयात खूप रस मिळेल.वैवाहिक नात्यात सुरू असलेल्या कलहातून तुम्हाला आराम मिळेल.

**कन्या**
मसालेयुक्त पदार्थ टाळल्यास आरोग्य चांगले राहील. जोडीदारासोबतचे गैरसमज दूर होतील.आर्थिक स्थिती मजबूत होईल.आजूबाजूच्या लोकांशी सौहार्द ठेवा.

**तूळ**
आरोग्य चांगले राहील.तुम्ही दिवसभर उत्साही राहाल हार्डवेअर व्यावसायिकांसाठी दिवस लाभदायक ठरेल. तुम्हाला तुमच्या प्रियकराकडून सरप्राईज मिळेल.

**वृश्चिक**
डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्यांनी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल.

**धनु**
तुमच्या नात्यात गोडवा येईल. बांधकाम व्यावसायिकांची सुरू असलेली कामे आज पूर्ण होतील. मुलाकडून तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्य चांगले राहील.

**मकर**
प्राध्यापकांसाठी दिवस लाभदायक राहील. लवकरच पुढे जाण्याची संधी मिळेल. पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करू शकतात.

**कुंभ**
नात्यात गोडवा वाढेल. विद्यार्थी वर्गमित्रांच्या मदतीने आपली पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण करतील, नोकरीच्या ठिकाणी पुढे जाण्याच्या योजना यशस्वी होतील.

**मीन**
धार्मिक कार्याकडे तुमचा कल राहील. इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल.











# नव्या आयुक्तांपुढे अनधिकृत बांधकामांचे आव्हान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार, ता. ३१ (बातमीदार)**

वसई विरार पालिकेच्या आयुक्तपदी एम. एम. सूर्यवंशी यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे. त्यांच्यापुढे सर्वात मोठे आव्हान असेल ते अनधिकृत बांधकामाचे. त्याचबरोबर पालिकेच्या जागांवरील अतिक्रमण उठविण्याचे असेल. त्यांची पर्यटन विकास महामंडळातील कारकीर्द उल्लेखनीय असली तरी या ठिकाणी मात्र त्यांच्या कामाची कसोटी लागणार आहे.

पालिकेत अनेक समस्या असून त्यावर एम. एम. सूर्यवंशींना काम करावे लागणार आहे. एका बाजूला वाढणारी अनधिकृत बांधकामे त्याला पाठीशी घालणारे अधिकारी यांच्यावर त्यांना वचक ठेवावा लागेल. त्याचबरोबर शहरातील नागरी प्रश्न, स्वच्छता, डम्पिंगचा प्रश्न त्याचबरोबर महत्वाचा प्रश्न म्हणजे आरोग्याचा प्रश्न या ठिकाणी महापालिकेची आरोग्य केंद्रे असली तरी मोठे हॉस्पिटल नाही. त्यासाठी सूर्यवंशींना काम करावे लागेल. रखडलेले रंगमंचाचे काम, नाट्यगृह, त्याचबरोबर पायाभूत प्रकल्प या क्षेत्रातही सुधारणा करावी लागेल.

काही दिवसांपासून पालिका अनधिकृत बांधकामानंतर पालिकेच्या रुग्णालयात मिळालेल्या अप्रमाणित औषधांचा साठ्यांची चर्चा आहे. त्यामुळे पालिकेच्या आरोग्य केंद्रातील कामावर लक्ष ठेवावे लागणार आहे. आयुक्तांना राजकीय पक्षांना बाजूला सारून त्याठिकाणच्या अनधिकृत बांधकामांना आळा घालावा लागेल, असे याठिकाणी बोलले जात आहे. त्यातच येणाऱ्या निवडणुकीची प्रभाग रचना हा त्यांच्या समोरचा महत्वाचा प्रश्न राहणार आहे. प्रभाग रचना करताना कोणत्याही पक्षाला झुकते माप न देता प्रभाग रचना करण्याचे मोठे काम सूर्यवंशींना करावे लागणार आहे. सूर्यवंशी यातून कसा मार्ग काढतात हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# लोकल प्रवासातील घुसखोरीमुळे दिव्यांगांची 'दिव्य परीक्षा'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मध्य रेल्वेवर धावणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या डब्यातून सदृढ पुरुष व महिलाही प्रवास करीत असल्याची बाब उघड झाली आहे. कल्याण रेल्वे स्थानकातून मुंबईकडे निघालेल्या लोकलमधील व्हिडिओ एका अज्ञात दिव्यांग व्यक्तीने काढला असून, तो समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. यात सुदृढ प्रवासी दिव्यांगांच्या डब्यातून गैरपद्धतीने प्रवास करीत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



कल्याण जंक्शनहून मुंबई, खोपोली व कसारा मार्गावर लोकल ट्रेन धावतात. प्रत्येक लोकल ट्रेनच्या डब्यांची प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, महिला, सामान, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक अशी वर्गवारी केलेली असते. ज्या डब्यातून प्रवास करायचा आहे, त्यासाठी नियम व पात्रता असाव्या लागतात; मात्र गर्दीच्या वेळी सर्व नियमांची पायमल्ली करीत कोणीही कोणत्याही डब्यातून प्रवास करीत असल्याचे वारंवार समोर येत आहे.

दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव असलेल्या डब्यात विशेष आसनव्यवस्था व व्हीलचेअरसाठी विशेष जागा उपलब्ध असते. या डब्यातून शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनाक्षम कमजोरी असलेल्या व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकच प्रवास करू शकतात. यासाठी त्यांच्याजवळ दिव्यांग असल्याचे ओळखपत्रही असणे बंधनकारक आहे. याखेरीज गर्भवती महिलांनाही या डब्यातून प्रवास करण्यासाठी मुभा दिली जाते. याव्यतिरिक्त इतर व्यक्ती प्रवास करताना आढळून आल्यास दंडात्मक कारवाई केली जाते. व्हायरल व्हिडिओमधील व्यक्तीने एका तरुणाला ओळखपत्र विचारले असता, या तरुणाने हाताला फ्रेक्चर असल्याचे निदर्शनास आणून दिले; मात्र इतर व्यक्ती या सुदृढ असून त्यांच्यामुळे इतर दिव्यांगांना डब्यात प्रवेश करता येत नसल्याचे या वेळी या व्यक्तीकडून सांगण्यात आले.

> **"नुकताच व्हायरल झालेला व्हिडिओ पाहिला. मी एका पायाने अपंग असल्याने डब्यात शिरण्यासाठी आधी मला थोडा वेळ लागत होता, मात्र फारशी अडचण जाणवत नव्हती. परंतु आता वयोमानाने मी रेल्वेचा प्रवास करणे थांबविले आहे. शिवाय पहिल्यापेक्षा गर्दीही खूप वाढली आहे. जर अशा पद्धतीने आमच्यासाठी राखीव असलेल्या डब्यातून हट्टेकट्टे लोक गर्दी करीत असतील तर आमच्यासारख्यांनी आत चढायचे तरी कसे ?**
>
> ● भाऊसाहेब गोसावी, दिव्यांग प्रवासी (कल्याण)

# करवसुली वाढीसाठी भिवंडी पालिका आयुक्तांनी घेतले कठोर निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ३१ :** भिवंडी महापालिकेची मालमत्ता करवसुली प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला अत्यंत कमी प्रमाणात होत असते. यामुळे पालिकेच्या खर्चावर मर्यादा पडत असतात. या पार्श्वभूमीवर आयुक्त अनमोल सागर यांनी नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत करवसुली वाढीसाठी ठोस आणि कठोर निर्णय घेतले. बैठकीत मालमत्ता करवसुलीची सद्यस्थिती तपासून घेण्यात आली. यावेळी असमाधानकारक वसुली करणाऱ्या लिपिकांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. बैठकीला उपायुक्त (कर) विक्रम दराडे, सर्व प्रभाग समितीतील कर निरीक्षक, वसुली लिपिक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कराच्या व्याजात सवलत देणारी कोणतीही अभय योजना राबवली जाणार नाही, अशी सूचनाही यावेळी देण्यात आली. करवसुलीमध्ये वाढ व्हावी यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोठ्या थकबाकीदारांची यादी चौकाचौकांत बॅनरवर व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करण्याचे आदेशही देण्यात आले. तसेच, कर न भरणाऱ्यांवर मालमत्ता जप्तीची मोहीम अधिक तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले. आयुक्त सागर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना कर्तव्यनिष्ठ कामगिरी करून पालिकेच्या उत्पन्नात वाढ साधण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेल आगाराची दयनीय अवस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बस डेपोचा रखडलेला प्रश्न मार्गी लावा - आ. विक्रांत पाटील**

**पनवेल :** पनवेल एसटी डेपो हा महाराष्ट्रातील काही प्रमुख मोठ्या बस आगारांपैकी एक मानला जातो. कोकण, तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या पनवेलचे भौगोलिक महत्त्व हे फार मोठे आहे व अनेक वर्षांपासून पनवेल बस डेपो येथून हजारो एसटी बसेसची वाहतूक होत असते. पनवेल बस डेपो मधून दिवसाला अडीच हजार गाड्या ये-जा करत असतात . अशा स्थितीमध्ये पनवेल बस डेपोची अवस्था फार दयनीय झालेली आहे. B.O.T. तत्त्वावरती या बस डेपोच्या विकासाचे काम हे एका कंत्राटदाराला दिले होते . परंतु सुरुवातीपासूनच या कंत्राटदाराने कामामध्ये दिरंगाई केली . आता काही तांत्रिक अडचणीमुळेही हा प्रकल्प धीम्या गतीने सुरू आहे. आमदार विक्रांत पाटील यांनी वेळोवेळी या विषयाचा पाठपुरावा करत, अधिवेशन काळात या विषयाची विशेष चर्चा घडवून आणली होती. या विषयाची एक विस्तृत बैठक सुद्धा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. परंतु अजूनही या विषयात काही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही.

पनवेल बस डेपोचा रखडलेला प्रश्न मार्गी लागावा याकरिता तात्काळ कार्यवाही करा, तसेच दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारावरही तात्काळ कारवाई करा, अशी मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी केली आहे. B.O.T. तत्वावर जर हा प्रकल्प पूर्ण करणे शक्य होत नसेल व त्यामध्ये प्रकल्पाच्या उंचीचे कारण दाखवत पर्यावरण खात्याकडून काही अडचणी असतील, तर या प्रकल्पाचे स्वरूप तात्काळ बदलावे व B.O.T. ऐवजी शासनाकडून या प्रकल्पाला पुढे नेण्याकरिता प्रयत्न करावे, जेणेकरून प्रकल्पाच्या उंचीचा प्रश्न हा निकाली निघू शकेल व प्रकल्प पूर्ण होऊ शकेल, असे आमदार विक्रांत पाटील म्हणाले. ते पनवेल एसटी डेपो येथे एका लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

# पाणीपट्टी भरण्यासाठी नवी मुंबई मनपात ऑनलाइन सुविधा सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. ३१ :** नवी मुंबई महापालिकेने शहराच्या डिजिटायझेशनमध्ये आणखी एक पाऊल पुढे टाकत पाणी कर ऑनलाइन भरण्याची सुविधा नागरिकांसाठी सुरू केली आहे. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे पाणी कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करणे असा आहे. यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यकारी अभियंता शंकर जाधव आणि त्यांच्या टीमद्वारे व्यापक जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.

जनजागृतीसाठी पालिकेने सोशल मीडिया ऑडिओ क्लिप, एनएनएमटी बसमधील घोषणा, ट्राफिक सिग्नल्स आणि विविध माध्यमांतून सूचनांचा प्रचार सुरू केला आहे. नागरिकांना चार मुख्य ऑनलाइन पर्यायांद्वारे पाणी कर भरण्याची सुविधा देण्यात आली आहे. या सर्व सुविधा वापरण्यास सोप्या असून, नागरिकांना कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. वेळ, ऊर्जा वाचवण्याबरोबरच व्यवहार अधिक सुरक्षित आणि कागदविरहित बनण्यास मदत होणार आहे. पालिकेच्या म्हणण्यानुसार, ऑनलाइन सेवा वापरल्यास नागरिकांची गैरसोय टळणार असून, भविष्यातील सेवा आणखी स्मार्ट, संगणकीकृत आणि सुटसुटीत करण्याचा निर्धार आहे.

नवी मुंबईकरांनी पाणी कर भरण्यासाठी ऑनलाइन पद्धतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा. कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. ग्राहकांची वेळ आणि ऊर्जा दोन्ही वाचतील. या सुविधेमुळे व्यवहार सुरक्षित आणि पारदर्शक राहतात, असे महापालिकेचे शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय ज्युनिअर लगोरी स्पर्धेत रायगडला अजिंक्यपद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : प्राचीन आणि स्वदेशी खेळ भारतीय लगोरी फेडरेशनच्या मान्यतेने आयोजित पहिली राज्यस्तरीय ज्युनिअर लगोरी अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच क्राईस्ट अकॅडमी स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे अत्यंत उत्साही वातावरणात यशस्वीरित्या पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना संपर्क प्रमुख कराड पाटणा व नवी मुंबई महिला जिल्हा प्रमुख शीतल सूर्यकांत कचरे, तसेच जिल्हा संपर्क प्रमुख महिला आघाडी, नवी मुंबई व नगरसेविका – दमयंती बबनशेठ आचरे यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज व स्व. संतोष गुरव यांच्या प्रतिमेला पुष्पहार व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लगोरी फोडून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महा लगोरी असोसिएशनचे डायरेक्टर भरत प्रल्हाद गुरव, सचिव वैभव शिंदे, मुंबई जिल्हा लगोरी संघटनेचे सचिव राकेश शेठ, तसेच अन्य मान्यवर, पदाधिकारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत १२ जिल्ह्यांतील एकूण २१० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. उद्घाटन प्रसंगी शीतल कचरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "स्व. संतोष गुरव यांनी मागील वर्षी याच ठिकाणी राज्यस्तरीय भव्य स्पर्धा आयोजित केली होती. दुर्दैवाने मी उपस्थित राहू शकले नाही. मात्र आज महा लगोरी संघटना जी कामगिरी करत आहे, ती खरोखरच गौरवास्पद आहे. संगणकीय युगात तरुणाई खेळांकडे पाठ फिरवते आहे, ही चिंताजनक बाब आहे. मात्र 'लगोरी'सारख्या पारंपरिक खेळाला नवसंजीवनी देण्याचे काम या संघटनेमार्फत केले जात आहे, ही अत्यंत कौतुकास्पद गोष्ट आहे."लगोरी खेळाच्या प्रसारासाठी, प्रचारासाठी महाराष्ट्रातील लगोरीचे जनक, क्रीडारत्न स्व. संतोष गुरव यांनी तन मन धन अर्पून प्रसार केल्यामुळे भारतातील सर्व राज्यांसह जगभरातील तीस देशांमध्ये आज तो मोठ्या प्रमाणात खेळला जात असून त्यांचे हे कार्य संपूर्ण भारतासाठी अभिमानास्पद असल्याचे अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणांतून अधोरेखित केले. मुलांमध्ये प्रथम क्रमांक रायगड,द्वितीय क्रमांक नांदेड,तृतीय क्रमांक: ठाणे आणि कोल्हापूर (सहविजेते)तर मुलींमध्ये प्रथम क्रमांक: रायगड,द्वितीय क्रमांक: ठाणे,तृतीय क्रमांक: पुणे आणि मुंबई (सहविजेते)टार्गेट लगोरी मुलांमध्ये प्रथम क्रमांक: पुणे,द्वितीय क्रमांक: बीड,तृतीय क्रमांक: मुंबई आणि नाशिक,टार्गेट लगोरी मुलींमध्ये प्रथम क्रमांक: मुंबई,द्वितीय क्रमांक: पुणे, मिक्स डबल्स गट : प्रथम क्रमांक: मुंबई उपनगर जिल्हा बक्षीस वितरण समारंभ शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त संदीप गुरव,ठाणे जिल्हा लगोरी संघटनेचे सचिव वैभव शिंदे, भारतीय लगोरी महासंघाचे पदाधिकारी विजय लोणारी, बीड जिल्हा लगोरी संघटनेचे सचिव प्रसाद साहू, नांदेड जिल्हा लगोरी संघटनेचे मोहम्मद अथर अहमद आणि शहीद उल्लाह,पुणे जिल्हा लगोरी संघटनेचे सचिव राजू गोसावी, महा लगोरी असोसिएशनचे डायरेक्ट्रर भरत गुरव, कोल्हापूर चे दीपक सुतार, मुंबई उपनगरचे रज्जाक सर, सुवर्णा जोशी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. ह्या स्पर्धेसाठी पंच म्हणून किरण सावंत, विजय लोणारी, प्रणव डोके, सुधीर नाझरे, राकेश, राज बिरगावले, हर्ष, सिद्धी गुरव यांनी पंच म्हणून उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली.

# गणेशोत्सव मंडळांना सर्व सुविधा द्या

## भिवंडी महापालिका आयुक्तांचे अधिकाऱ्यांना आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात सार्वजनिक गणेशोत्सव सुरळीतपणे संपन्न होण्यासाठी महापालिका प्रशासनाने तयारी सुरू केली असून महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष बैठक घेऊन शहरातील खराब झालेले रस्ते तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश दिले आहेत त्याचबरोबर विसर्जन स्थळांची व मिरवणूक मार्गाची पाहणी करून तातडीने गणेशोत्सव मंडळांना सुविधा निर्माण करून देण्याचे आदेश दिल्याची माहिती भिवंडी पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आज दुपारी झालेल्या बैठकीत दिली.




आगामी काळात गणेशोत्सवास सुरुवात होणार असल्यामुळे सार्वजनिक गणेश उत्सव महामंडळाच्यावतीने खराब रस्ते,स्वच्छता,विसर्जन स्थळांची झालेली दुरावस्था व इतर नागरी सुविधा संदर्भात लेखी निवेदन देण्यात आले होते. त्याअनुषंगाने महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आज दुपारी पालिका सभागृहात गणेशोत्सव महामंडळ पदाधिकारी व पोलीस दलाची सयुक्तिक बैठक आयोजित केली होती. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, अतिरिक्त पालिका आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त दराडे व महामंडळाचे कार्याध्यक्ष गणेश मोरे, माजी अध्यक्ष शरद भसाळे,उपाध्यक्ष संजय काबुकर, सुनील बाबा शिंदे, नरेंद्र वगळ,सदानंद पिंपळे,दिलीप खाने यांच्या सह पदाधिकारी व महापालिका अधिकारी उपस्थित होते,गणेशोत्सव तोंडावर आलेला असताना सुध्दा महापालिका प्रशासन खराब व खड्डेमय रस्त्याबाबतीत मुक भूमिका बजावत आहे. विसर्जन स्थळाची दुरावस्था झाली आहे, सर्वत्र अस्वच्छता आहे महापालिका आयुक्तांनी तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी यावेळी महामंडळ अध्यक्ष मदन भोई यांनी केली. तर गणेशोत्सव सोहळा उत्साहात आणि शांततेत पार पाडण्यासाठी उत्सव मंडळांनी पोलीस व महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच उत्सव साजरा करताना मनपा व पोलीस प्रशासनाची परवानगी घ्यावी असे आवाहन यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी केले.गणेशोत्सव हा सण मोठ्या उत्साहात साजरा होणार असल्याने महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी शहरात स्वच्छता,रस्ते दुरुस्ती, औषध फवारणी,पाणी पुरवठा ,विद्युत पुरवठा व अतिक्रमणे हटवणे,सर्व विसर्जनघाटावर स्वच्छतेकडे लक्ष द्यावे अशी सुचना यावेळी पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिली. कामात कोणत्याही प्रकारे कसुर करू नये असे आदेश दिले.गणेशोत्सव सुरळीतपणे पार पाडण्यासाठी महापालिका व पोलीस प्रशासन सज्ज असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.यावेळी गणेशोत्सव महामंडळ पदाधिकाऱ्यांनी सुध्दा विविध समस्या मांडून त्या दुर करण्याची मागणी केली.

## भिवंडी महानगरपालिकेतर्फे

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे १८/०२/२०२५ चे परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका मा. प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार दि.०१/०८/२०२५ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मा. सहा आयुक्त (प्रशासन) अजित महाडिक यांच्या शुभहस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर नारपोली येथिल आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयास मा. सहा आयुक्त प्रभाग समिती क्र. ४ गिरीष घोष्टेकर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यांमधील वाटेगांव येथे अत्यंत छोट्या गांवी लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट रोजी झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळींमध्ये त्यांनी त्यांच्या शाहिरीतून महत्वाचे योगदान दिलेले होते, अशा लोकशाहीर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी मुख्यलयातील कार्यालयात मुख्य अग्निशमन अधिकारी राजेश पवार, परवाना, जाहिरात व मार्केट विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी, दुरध्वनी विभाग प्रमुख आश्विनी पांडव, बारनिशी विभाग प्रमुख दिपीका ठाकरे तर प्रभाग समिती क्र. ४ येथी कार्यक्रमास गिरीष घोष्टेकर- प्रभाग अधिकारी, फ़ैसल तातली आरोग्य विभाग प्रमुख, हरीष भंडारी -मुख्य आरोग्य निरीक्षक, अनिल आव्हाड कार्यालयीन अधिक्षक प्र. स.क्र.४, तसेच विकास निकम माजी नगरसेवक, लक्ष्मण गायकवाड (सेवानिवृत्त) शहर अभियंता भिनिशमनपा व इतर कर्मचारी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास चोवीस तासात अटक

## स्थानिक गुन्हे शाखा व वासिंद पोलिसांची कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील पूर्व भागात घरफोडी करणाऱ्या एका चोरट्या तरुणाला चोवीस तासात ताब्यात घेऊन त्यांच्या जवळील मुद्देमाल जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखा व वासिंद पोलिसांना यश आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार येथील शहरातील पूर्व भागातील राईस मिल समोरील महंत मलाया अपार्टमेंन्ट येथे राहणाऱ्या सागर सखाराम उबाळे हे आपल्या पत्नीसह घर बंद करून दि. 29 ते 30 जुलै रोजी बाहेर गेले असता, या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे बंद घराचे कुलूप तोडुन घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकुण 1 लाख 46 हजार 500 रुपये किंमतीचा मुद्देमाल घरफोडी करून चोरण्यात आला होता.

यासंदर्भात फिर्यादी सागर उबाळे यांनी वासिंद पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद दाखल करण्यात आला होता. सदर, चोरीचे गुन्हयांचे गाभिर्य लक्षात घेता पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण डॉ. डी.एस.स्वामी, अपर पोलीस अधिक्षक अनमोल मित्तल यांनी समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणणे कामी स्थानिक गुन्हे शाखा व ठाणे ग्रामीण यांना आदेश देवून मार्गदर्शन केले. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे व ठाणे ग्रामीण पोलीस यांनी गुन्हा उघडकीस आणणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शनपर सुचना देण्यात आल्या.



या पथकांकडून तपास सुरू असताना पथकाला गुप्त बातमीदारामार्फत तसेच तांत्रीक तपास करुन कोणताही धागा दोरा नसताना अथक परीश्रम घेवून आपले गुप्त बातमीदारांचे मार्फतीने सदरचा गुन्हा करणाऱ्या आरोपी गणेश सखाराम डगळे ( वय 22) रा. संकल्प अपार्टमेंन्ट, भोंडवे नगर वासिंद यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्य पूर्ण तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली तर या घरफोडीत चोरलेला 1 लाख 38 हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करून त्यास पुढील कार्यवाही कामी वासिंद पोलीस ठाण्यात देण्यात आलेले आहे.

सदरचा, गुन्हा पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण डॉ. डी.एस. स्वामी, अपर पोलीस अधिक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे व ठाणे ग्रामीण यांच्या सुचनेप्रमाणे पो.उप.निरीक्षक महेश कदम, पो.उप.निरीक्षक भाऊसाहेब गायकवाड, पो.उप. निरीक्षक शरद सुरळकर, पो.ह.संतोष सुर्वे, गोविंद कोळी, पो.शि स्वप्नील बोडके, सुरेश धिंदळे यांचे पथकाने उघडकीस आणलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास वासिंद पोलीस ठाणे करीत आहे.



# गावराईपाडा गावात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गावराईपाडा गावात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५वी जयंती पहिल्यांदाच मोठ्या उत्साहात आणि सन्मानाने साजरी करण्यात आली. ही ऐतिहासिक जयंती भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनातून, तसेच स्थानीय भाजपा पदाधिकारी सहकार्याने गणेश पाटील यांच्या संयोजनातून पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या जीवनकार्यावर भाषण झाले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी विचारांचे स्मरण करत पुढील पिढीसाठी सामाजिक एकतेचा संदेश दिला. या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टी वसई उत्तर पूर्व मंडळाचे अध्यक्ष कुणाल घरत, सरचिटणीस समाधान सिरसट आणि गणेश भुरकुंड, सुनील किनी, अक्षय पाटील,संदीप मिश्रा, कैलासनाथ मिश्रा, संदीप घरत, विनिता विश्वकर्मा, शरयू राठोड, नायकु देसाई, राहुल तिवारी, लालचंद शुक्ला यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

भाजप पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक वर्ग आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते. यावेळी सामाजिक ऐक्य, शिक्षणवाढ आणि परिवर्तनाचे विचार पुढे नेण्याचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजक गणेश पाटील आणि सहसंयोजक मंदार गावड, यश पाटील व योगेश पाटील होते. ही जयंती गावराईपाडा गावासाठी केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नव्हती, तर सामाजिक जागृती आणि एकात्मतेचा एक नवा अध्याय ठरली.

# किशोर गावात एक पेड मा के नाम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: भारत सरकार, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय अंतर्गत मेरा युवा भारत ठाणे द्वारा महाराष्ट्र युवा संघ कल्याण (जिल्हा युवा संस्था पुरस्कार महाराष्ट्र शासन) व वाईल्ड इंडिया ०५ फाऊंडेशन मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक पेड मा के नाम कार्यक्रम किशोर गाव येथे पार पडला. पर्यावरण संवर्धनासाठी एक पेड मा के नाम अंतर्गत ६५ झाडे लावण्यात आली.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी संजूदास राठोड, स्काय डायव्हर अजित कारभारी, परिमंडळ वन अधिकारी साहेबराव खरे, वनरक्षक विनायक पवार, वाईल्ड इंडिया ०५ फाउंडेशन साहिल पवार, निलेश जाधव, प्रविण भालेराव, गरजा प्रतिष्ठान सचिव अजिंक्य डोंगरे हे उपस्थित होते. तसेच वन विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शन युवक युवतींना लाभले. मेरा युवा भारत ठाणे च्या जिल्हा युवा अधिकारी मनिषा शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी ५१ युवक युवतींना मेरा युवा भारत ठाण्याचे भारत सरकारचे प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.


# महसूल दिनानिमित्त मुरबाड तहसिल कार्यालयात आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तहसील कार्यालय मुरबाड येथे आज महसूल दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिराचे उद्घाटन मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरांतर्गत एकुण 200 नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला असून ५० हून अधिक नागरिकांनी रक्तदान केलेले आहे.यात महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचा मोठा सहभाग होता. सदर रक्तदान शिबिर आयोजित करण्यासाठी केसरी रक्तपेढी उल्हासनगर यांनी मोलाचे सहकार्य केले. सोबतच तालुका आरोग्य विभाग यांच्याकडूनही चांगले सहकार्य लाभलेले होते. यावेळी नायब तहसीलदार सुषमा बांगर , अमोल शिंदे तसेच तहसिलचे सर्व कार्यालयीन कर्मचारी,अधिकारी उपस्थित होते. तसेच यावेळी महसूल विभागातील गुणवंत अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे




सत् हे परमेश्वराचे नाव आहे. सर्वांचे ठायी जो ईश्वराचे दर्शन करतो तो सदगुरू होय. अधिकारी शिष्याला सदगुरू अवश्य मिळतो. सद शिष्यालाच गुरुकृपा मिळते आणि ईश्वर दर्शन होते. सदगुरुतत्व व ईश्वरतत्व एक आहेत. ईश्वर ज्याप्रमाणे व्यापक आहे त्याचप्रमाणे गुरूही व्यापक आहे. ज्याचा कुठेही अभाव नसतो तो व्यापक होय. व्यापकाला शोधण्याची नव्हे, तर ओळखण्याची आवश्यकता असते. परमात्म्याप्रमाणे गुरूही व्यापक असतो. पण त्या व्यापक गुरूंचा सानिध्य पात्र अधिकारी शिष्यालाच प्राप्त होतो

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# ठाणे मनपाकडून अनधिकृत इमारतींचा पाणीपुरवठा बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांच्या १३४ नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने केलेल्या कारवाईत ७९ बोअरवेल बंद करण्यात आल्या. तर, १८ मोटर पंप जप्त करण्यात आले. या सर्व नळ जोडण्या अनधिकृतपणे घेण्यात आल्या होत्या. त्यासंदर्भात गुन्हे दाखल करण्याची कारवाईही करण्यात येत आहे.

अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा दिला असल्यास त्याची कागदपत्रे तपासण्यात यावीत. तसेच, बांधकाम अवैध असल्यास नळसंयोजन तात्काळ खंडीत करण्यात यावे, त्याचप्रमाणे महापालिकेच्या जलवाहिनीवरुन अवैधरित्या नळसंयोजन घेतले असल्यास तेही तातडीने खंडीत करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाणी पुरवठा विभागास दिले आहेत.



तक्ता -१

| दिनांक | नळ जोडणी खंडित - बोअरवेल बंद - मोटर जप्त |
|---|---|
| २५ जुलै | ०४-०७-०० |
| २६ जुलै | १०-०४-१० |
| २८ जुलै | २८-१९-०२ |
| २९ जुलै | ३१-१५-०२ |
| ३० जुलै | ३४-११-०१ |
| ३१ जुलै | २७-२३-०३ |
| एकूण | १३४-७९-१८ |

त्या अनुषंगाने, २५ जुलैपासून महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांची नळ जोडणी खंडित करण्याची विशेष मोहीम घेण्यात आली. या मोहिमेत दिवा, मुंब्रा, माजिवडा-मानपाडा, कळवा, उथळसर, लोकमान्य नगर-सावरकर नगर या प्रभाग समिती क्षेत्रात पाहणी करून कारवाई करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता (पाणी पुरवठा विभाग) विनोद पवार यांनी दिली. या मोहिमेत अर्धवट बांधकाम असलेल्या तसेच व्याप्त असलेल्या अनधिकृत बांधकामांची पाहणी करून तेथील नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. पंपही जप्त करण्यात आले असून बोअरवेलही बंद करण्यात आल्या आहेत.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

# ज्या घराची महिला सुदृढ ते घर सुखी - आ. किसन कथोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ज्या घराची महिला सुदृढ ते घर सुखी आणि आनंदी असल्याचे प्रतिपादन मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड माऊली सभागृह येथे झालेल्या बचतगट महिला मेळाव्यात केले.

गरूडझेप महिला प्रभाग संघ कुडवली यांची वार्षिक सर्वसाधारण सभा 2024-25 आज मुरबाड येथे पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार कथोरे यांनी उपस्थित महिलांना आरोग्य विषयक मोलाचे सल्ले दिले. महिलांनो प्रथम तुम्ही आपल्या तब्बेतीकडे लक्ष द्या. तुमचे आरोग्य सुदृढ असेल तर तुमचे कुटंब सुखी व समाधानी होईल. उत्तम आहार करा,आजार लपवून ठेवू नका. सध्या महिलांच्यात कॅन्सरचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून दुर्लक्ष करू नका.यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार असून गावोगावी महिलांचे कॅन्सर तपासणी शिबिर घेण्यात येणार आहेत. कॅन्सरमुक्त मुरबाडसाठी माझे प्रयत्न असून त्या दिशेने आपण कामाला सुरुवात केली असल्याचे म्हटले आहे.याज बरोबर महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी पुढे या व स्वतः आर्थिक सक्षम बना व आपल्या कुटुंबाला पुढे न्या असा मोलाचा सल्ला यावेळी उपस्थित महिलांना दिला.या मेळाव्याला माजी सभापती दिपक पवार व बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कॅफेचा शेफ लाखाची रोकड घेऊन पसार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील खडकपाडा परिसरात असलेल्या एका कॅफेत शेफ म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीने शेफ मालकाच्या टेबलवर पाकिटात ठेवलेली 1 लाख 18 हजार रुपयांची रोकड घेऊन पसार झाल्याची घटना घडली असून याबाबत खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

खडकपाडा परिसरात फिर्यादी किरण शिखरे यांचे द पर्शियन डिलाईट इराणी कॅफे या नावाने कॅफे आहे. या कॅफेत मोंटू शेख हा फेब्रुवारी महिन्यापासून कामाला होता. 21 जुलै रोजी मध्यरात्री 1 वाजून 42 मिनिटांनी द पर्शियन डिलाईट इराणी कॅफेच्या मागच्या बाजूला असलेल्या शिखरे यांच्या कार्यालयात मोंटू शेख हा न बोलवता ऑफिसमध्ये आला. ऑफिसमध्ये मॅनेजर, असिस्टंट कुक व इतर सहका-यांची बैठक चालू होती. ऑफिसच्या टेबलवर इन्व्हलप मध्ये 1 लाख 18 हजार रोख रक्कम होती.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना कल्याण मनपातर्फे अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : साहित्यरत्न ,लोकशाहीर कल्याण : साहित्यरत्न ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती दिनी महापालिका मुख्यालयात आज महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी साहित्यरत्न ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महापालिका सचिव किशोर शेळके, उपआयुक्त वंदना गुळवे, संजय जाधव, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार व इतर अधिकारी/ कर्मचारी



तसेच आखिल भारतीय मातंग संघ कल्याण शहर, अण्णाभाऊ साठे स्मारक समिती उत्सव अध्यक्ष रामदास साबळे, अखिल भारतीय मातंग सेना शहर जिल्हाध्यक्ष मोहन मधुकर गवळी ,उपाध्यक्ष दिपक कारके, महाराष्ट्र उपाध्यक्ष विनोद गवळी, कल्याण शहर अध्यक्ष चक्रधर घुले, दिलीप रोकडे ,गणेश ताटे , इतर समाज बांधव आणि नागरीक उपस्थित होते.

तद्नंतर लाल चौकी, कल्याण (प.) येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्यास महापालिका उपायुक्त संजय जाधव व सहा.आयुक्त धनंजय थोरात यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यासमयी शिक्षणाधिकारी विजय सरकटे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, इतर अधिकारी /कर्मचारी, समाज बांधव व अनेक नागरीक उपस्थित होते.

# खानिवलीत किराणा दुकानाला भीषण आग



**आगीत लाखोंचे सामान भस्मसात**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : तालुक्यातील खानिवली येथे जय हरी प्रसाद किराणा अँड जनरल स्टोअर्स या दुकानाला 30 जुलै च्या मध्यरात्री लागलेल्या आगीत संपूर्ण दुकान खाक झाले असून लाखोंचे नुकसान झाले आहे. आग रात्री लागल्यामुळे जीवितहानी टळली मात्र ही आग अपघाती नसून कोणीतरी लावली असल्याचा संशय दुकान मालकाने व्यक्त केला आहे. मध्यरात्री दुकानाला आग लागली असता स्थानिकांनी वाडा नगरपंचायतीच्या अग्निशमन दलाला पाचारण केले मात्र आग भीषण असल्याने अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत लाखोंचे किराणा सामान जळून खाक झाले होते.याबाबत तक्रारदार मालक दूंदाजी पाटील यांच्या तक्रारीवरून वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान घटनेला अनुसरून खानिवली व्यापारी मंडळाकडून खानिवली येथे पोलीस चौकीत कायमस्वरूपी पोलीसबळ उपलब्ध रहावे याबाबत निवेदन दिले असून कार्यवाही न झाल्यास उग्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# कॅप्टन ओक हायस्कूलमधील विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलमधील कलाशिक्षक कैलास यादव सरोदे, हे दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले; त्यांनी आपल्या सेवाकाळात उपक्रमशील कलाशिक्षक म्हणून नावलौकिक मिळविला तसेच त्यांनी विद्यार्थी व पालक प्रिय शिक्षक म्हणूनही आपली ओळख निर्माण केली होती. त्यांनी आपल्या सेवापूर्ती वर्षानिमित्तही अनेक उपक्रम आपल्या संकल्पनेतून व सौजन्याने राबविले. जसे... 'संवाद कृषिपुत्राशी', शैक्षणिक सहलीवर आधारित 'वृत्तांत लेखन स्पर्धा' भित्तीचित्र-चित्रकला स्पर्धा , 'टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणे स्पर्धा', 'मुक्त चित्रकलाविष्कार' चित्रकला स्पर्धा व 'सुंदर फलक लेखन' स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच संस्थेच्या सर्व शाळातील शिक्षकांसाठीही सुंदर फलक लेखन स्पर्धा घेतली होती.

दि. ३० जुलै २०२५ रोजी 'संवाद कृषीपुत्राशी' व 'मॉन्टेरिया व्हिलेज' या शैक्षणिक सहलीवर आधारित वृत्तांत लेखन स्पर्धेचा, 'भित्तीचित्र' चित्रकला स्पर्धेचा व 'टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे' या स्पर्धांचा बक्षीस समारंभ घेण्यात आला. या बक्षीस समारंभाला अध्यक्ष म्हणून बालक मंदिर संस्थेचे सहकार्यवाह प्रसाद ग. मराठे लाभले होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कल्याणच्या गजानन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कांचन शशांक भालेराव ह्या लाभल्या होत्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रसाद मराठेंना, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून कांचन भालेराव यांना शाळेतर्फे सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले व शाळेचे मुख्याध्यापक म्हणून.दिलीप तडवी यांनाही सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले.

घेण्यात आलेल्या चारही स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकाचे व उत्तेजनार्थ बक्षीसं म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रे देण्यात आली. यावेळी 'भित्तीचित्र' चित्रकला स्पर्धेसाठी व 'टाकातून टिकाऊ वस्तू बनविणे' स्पर्धेसाठी परीक्षक





म्हणून विशेष सहकार्य केल्याबद्दल शाळेतील कलाशिक्षक पांडुरंग भारती व देवेंद्र कापसे यांना तर मॉन्टेरिया व्हिलेज या शैक्षणिक आधारित वृतांत लेखन स्पर्धेचे परीक्षक म्हणून विशेष सहकार्य केले म्हणून मनीषा जाधव व रंजना बावस्कर यांना तसेच 'संवाद कृषिपुत्राशी' या कार्यक्रमावर आधारित वृतांत लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विशेष सहकार्य केलेले रमाकांत सोनवणे यांना शाळेतर्फे सन्मानचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले व 'मॉन्टेरिया व्हिलेज' या शैक्षणिक सहलीवर आधारित उत्स्फूर्त लेखन केल्याबद्दल रूपाली कोंडेजकर यांनाही सन्मानचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक दिलीप तडवी व ज्येष्ठ शिक्षक उत्तम गायकवाड, बाळकृष्ण शिंदे यांचे मला नेहमीच स्पर्धा व उपक्रमांसाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले आहे . अमिता पाठक यांचेही नेहमीच उपक्रम व स्पर्धांना प्रेरणा व सहकार्य मिळाले आहे ; म्हणून अमिता पाठक यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले.तसेच माझ्या स्पर्धा व उपक्रमांना इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही नेहमीच सहकार्य लाभले आहे. यावेळी मिलिंद खळदकर यांना नुकत्याच ५१ व्या महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मास्टर टू (५९ किलो) वजनी गटात सुवर्णपदक मिळविल्याबद्दल शाळेतर्फे सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

> **कैलास सरोदे यांनी आपल्या मनोगतात बोलताना सांगितले की, मी थंडी, ऊन ,वारा व पावसात शालेय जीवनात लोकांच्या शेताच्या बांधावर काम केलेला एका शेतमजुराचा मी मुलगा आहे. शालेय जीवनामध्ये माझी खूप परवड झाली. लहानपणी मी माझ्या आई वडिलांची व मोठ्या भावांची जगण्यासाठीची झालेली वाताहत मी खूप जवळून बघितली. मी शाळेत काम करीत असताना माझ्या लहानपणी जे काही भोगलं ,त्या घटना व प्रसंग समोर ठेवून शाळेसाठी विद्यार्थ्यांसाठी व संस्थेसाठी काम करत आलोय. आजच्या कार्यक्रमांचा मला खूप आनंद आहे आणि तेवढं दुःखही आहे. शाळा सोडताना मला खूप वाईट वाटतंय, सेवानिवृत्तीपूर्वी शाळेत मी अधिकृतपणे येत होतो, आणि आताच्या येण्यामध्ये मला खूप फरक जाणवतो, ही वेदना त्यांनी बोलून दाखविली. शाळेने व संस्थेने मला खूप काही दिलंय ,मी शाळा व संस्थेचे ऋण कधी विसरू शकत नाही, त्यामुळे मी शाळेला आई मानलंय हे सगळं सांगत असताना कैलास सरोदे अतिशय भावनिक झाले होते.**

शाळेचे मुख्याध्यापक दिलीप तडवी यांनी कैलास सरोदे यांनी आतापर्यंत शाळेत विद्यार्थ्यांसाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत . सेवानिवृत्तीनंतरही ते शाळेत येऊन विद्यार्थ्यांना रिक्त तासिकांना उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञान देण्याचा काम करीत आहेत ,असे आपल्या प्रास्ताविकातून कौतुक केले. संस्था, शाळा, विद्यार्थी व पालकांचे भरभरून प्रेम मला मिळाले ,असे आवर्जून सांगितले.तसेच सरोदे यांनी स्पर्धा व उपक्रमांचा हेतूही स्पष्ट करून सांगितला. गेल्या वर्षी घेण्यात आलेल्या 'संवाद कृषिपुत्राशी' या विद्यार्थ्यांसाठीच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात त्यांच्या जळगांव जिल्ह्यातील लोहारा गावचे कृषिभूषण ,कृषिरत्न शेतकरी विश्वास आनंदराव पाटील व जळगांवचे शिवव्याख्याते जयवर्धन नेवे यांचा 'छत्रपती शिवाजी महाराज व आजचा युवक' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी ठेवलेले व्याख्यान, हे दोन कार्यक्रम नेहमीच लक्षात राहतील असे झाले होते. असे अभिमानाने सांगितले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या कांचन भालेराव यांनी सरोदे यांच्याविषयी बोलताना सांगितले की, आजचा आनंदाचा प्रसंग जास्त महत्त्वाचा आहे कारण सरोदे यांनी विशेषत्वाने वर्षभरात ज्या काही स्पर्धा आयोजित केल्या आहेत, त्या सर्व स्पर्धांचा बक्षीस समारंभ आज येथे आहे. सगळच आगळं वेगळं आहे. सरोदे यांनी अशा स्पर्धा आयोजित करणं त्यातनं विद्यार्थ्यांना बक्षीस समारंभ ठेवणं आणि सेवानिवृत्ती झाल्यावर सुध्दा सरोदे हे येथे सातत्याने शाळेशी संपर्कात आहेत, शाळेत येऊन तुम्हा विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहेत. यासारखी इतक्या आनंदाची गोष्ट शाळेसाठी आणि संस्थेसाठी दुसरी नाही! खरोखरच इतके वर्ष मी या क्षेत्रात आहे पण असं व्यक्तिमत्व की ,जे सेवानिवृत्त झाल्यावरसुध्दा शाळेत यावसं वाटतं ,शाळेतील विद्यार्थ्यांसाठी काम करावसं वाटतं, असं वाटणारी व्यक्ती आज मला बघायला मिळते आहे, ही आनंदाची ,कौतुकाची, शाळेसाठी व संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. असे भरभरून कौतुक केले. यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना बोध मिळेल अशी गोष्टही सांगितली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसाद मराठे यांनी सरोदे यांच्याविषयी बोलताना सांगितले की, सरोदे यांची तळमळ खरोखरच सर्वांनाच जाणवते. तुम्हालाही ही तळमळ जाणवलेली असेल. सरोदे यांनी एक वाक्य असं वापरलं की, मी शाळेत अधिकृतपणे पूर्वी येत होतो त्यामध्ये आणि आता येण्यामध्ये मला खूप फरक जाणवतो, त्यावर मराठे म्हणाले की, पण मला असं वाटतं की, आपला मुख्य केंद्रबिंदू हा विद्यार्थी आहे, त्यामुळे तुम्हाला जरी तसं वाटत असलं तरी आम्हाला तसं अजिबात वाटत नाही, जे पूर्वीचे सरोदे आहेत तेच आताचे सुद्धा आहेत. असंच आम्हाला सुद्धा सगळ्यांना वाटतंय. प्रसाद मराठे यांनी सरोदे यांच्या स्पर्धा व उपक्रमांचे भरभरून कौतुक केले.सरोदे यांनी त्यांना सहकार्य करणाऱ्या काही शिक्षकांची नांवे घेतली, त्यावर ते मराठे असं म्हणाले की, अजूनही त्याव्यतिरिक्त आपल्या शाळेतील अनेक शिक्षक असे आहेत की,ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विशेष प्रयत्न करीत असतात. आणि त्याचा परिपाक, त्याचा सार म्हणजे आजचा बक्षीस समारंभ! यावेळी मराठे यांनी अभिमानाने सांगितले की, मीही याच शाळेचा विद्यार्थी होतो, यावेळी त्यांनी त्यांच्या वेळच्या शाळेतील आठवणी सांगितल्या.तसेच तसे गुरु शिष्य परंपरेची गोष्टही सांगितली.

यावेळी विविध स्पर्धातून बक्षीसपात्र विद्यार्थी बक्षीस घेताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद विशेष बघण्यासारखा होता. पालकही सरोदे यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रम व स्पर्धा बद्दल खूप समाधान व्यक्त करत होते. या बक्षीस समारंभ कार्यक्रमाचे ऐकतच राहावे असे श्रवणीय सूत्रसंचालन शाळेतील अमिता पाठक यांनी केले आणि उपस्थितांचे आभारही त्यांनी आपल्या गोड अशा मधुर वाणीने मानले. शाळा ,संस्था ,विद्यार्थी व पालकांमध्ये सरोदे यांनी राबविलेल्या उपक्रम व स्पर्धांबद्दल कौतुक करण्यात येत आहे.

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.